# मानवतेतून मंदिर-मशिदीची सुरक्षितता

## डॉ. रामविलास वेदांती यांचे प्रतिपादन

**पुणे : प्रतिनिधी**

आतंकवाद, जातिधर्माच्या नावावरील हिंसाचार यामुळे जगभरात अशांततेचे वातावरण आहे. त्यामुळे सर्व धर्मगुरू, इमाम, राष्ट्रांचे पंतप्रधान, मुख्यमंत्री व प्रमुख व्यक्तींनी पुढाकार घेऊन मानवतेच्या रक्षणासाठी प्रयत्न करायला हवेत. मानवतेच्या एकतेतून मंदिर-मशिदींची सुरक्षितता कायम राहणार असून, समाजात शांती प्रस्थापित होणार आहे, असे प्रतिपादन अयोध्या येथील रामजन्मभूमी शिलान्यासाचे कार्यकारी अध्यक्ष व माजी खासदार डॉ. रामविलास वेदांती यांनी केले.




**विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणेच्या वतीने दिला जाणारा 'तत्त्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर जागतिक शांतता पुरस्कार २०१५' मानव एकता मिशनचे अध्यक्ष महायोगी श्री एम (मुमताज अली खान) यांना डॉ. रामविलास वेदांती हस्ते प्रदान करण्यात आला.**

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणेच्या वतीने दिला जाणारा 'तत्त्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर जागतिक शांतता पुरस्कार २०१५' मानव एकता मिशनचे अध्यक्ष महायोगी श्री एम (मुमताज अली खान) यांना डॉ. रामविलास वेदांती यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी पुणेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ दा. कराड, जागतिक आरोग्य संघटनेचे (डब्ल्यूएचओ) सल्लागार डॉ. चंद्रकांत पांडव, माईर्स एमआयटी शिक्षणसंस्था समूहाचे उपाध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, माईर्स एमआयटीचे संस्थापक विश्वस्त प्रकाश जोशी, माईर्स एमआयटी शिक्षणसंस्था समूहाचे सचिव व कार्यकारी संचालक डॉ. मंगेश कराड, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, माईर्स एमआयटीच्या कार्यकारी संचालिका डॉ. सुचित्रा कराड आदी उपस्थित होते.

श्री एम ऊर्फ मधुकरनाथ म्हणाले, आजच्या या आगळ्या-वेगळ्या आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या नावाने मिळालेल्या जागतिक पुरस्काराने भारावून गेलो आहे. 'वॉक ऑफ होप' यात्रेदरम्यान आळंदी येथे अजाण वृक्षाखाली संत ज्ञानेश्वरांच्या साक्षात्काराने भारावलो होतो. तीच भावना आजही आहे. महाराष्ट्राने नेहमीच आमचे स्वागत केले आहे. भारतभर यात्रा केली. मात्र, संतांची भूमी असलेल्या महाराष्ट्रात मोठा प्रतिसाद मिळाला. आपण सारे चालते-फिरते मंदिर आहोत. प्रत्येकाच्या हृदयात ईश्वर वसलेला आहे. त्याची पूजा आरती करून नाही, तर सेवाभावाने साध्य होणार आहे. त्यासाठी आपण सगळ्यांनी मानववादी व्हायला हवे.

डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, एकविसाव्या शतकात देशाला व जगाला जोडण्यासाठी श्री एम यांनी कन्याकुमारी ते काश्मीर अशी पदयात्रा करून समाजात मनोमिलन (नेटवर्किंग ऑफ माईंड्स) करण्यासाठी केलेल्या कार्याबद्दल त्यांचा सन्मान करताना आमचाही सन्मान होत आहे. मानवतेच्या कल्याणासाठी त्यांनी केलेले कार्य सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे. त्यांच्या या प्रवासात आपणही सहभागी होऊन मानव एकतेसाठी खारीचा वाटा उचलायला हवा.